# कृती संशोधन प्रकल्प विषय (2019–20)

## पर्यावरण संवर्धनासाठी लक्षणीय स्थानिक प्रयत्नांचा अभ्यास

### प्रस्तावना

नैसर्गिक पर्यावरण आणि त्याचा भाग असणाऱ्या समुदायांचे संरक्षण, जतन, व्यवस्थापन आणि पुनर्स्थापन म्हणजेच पर्यावरण संवर्धन होय. यामध्ये नैसर्गिक स्रोतांच्या मानवी वापराचे सुयोग्य व्यवस्थापन, तसेच शाश्वत वापर यांचा समावेश होतो.

निसर्गाचे संवर्धन विविध कारणांनी महत्त्वाचे ठरते. वाढते प्रदूषण, स्रोतांची ढासळती पातळी आणि दर्जा लक्षात घेता, मानवाचा 'उद्या' चांगला असण्यासाठी संवर्धन हा एकच मार्ग आहे.

### संवर्धन कशासाठी ?

सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी जैवविविधतेचे संवर्धन महत्त्वाचे आहे. एखादी प्रजाती लुप्त झाल्यास किंवा एखाद्या परिसंस्थेचा ऱ्हास झाल्यास मानवासह संपूर्ण सजीव सृष्टीला धोका निर्माण होऊ शकतो.

पाण्याचा दर्जा आणि उपलब्धतेच्या दृष्टीने जलस्रोतांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. भूजलपातळीत झपाट्याने होणारी घट, पाणथळ जमिनींचा ऱ्हास, जलस्रोतांचे प्रदूषण अशा गोष्टी जलस्रोतांच्या संवर्धनाची गरज अधोरेखित करतात. नद्या, निर्झर, तलाव यांच्या संरक्षणातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. अन्न आणि जलस्रोतांचे संवर्धन होते, मासेमारीला वाव मिळतो, तसेच पर्यटनाच्या संधी वाढतात.

बागा, निसर्गवने, सागरकिनारे अशा निसर्ग सान्निध्यामुळे मानसिक आणि सामाजिक आरोग्यात सुधारणा होते, ताणतणाव कमी करण्यास मदत होते. पदभ्रमण, गिर्यारोहण यांसारख्या मोहिमांमुळे आरोग्यसंवर्धन होते.

संवर्धनामुळे स्थानिक व्यवसायांच्या संधी वाढतात, करांद्वारे मिळणारे उत्पन्न वाढते, स्थानिक प्रशासनाचा मनोरंजनाच्या साधनांची उपलब्धता, पर्यावरणाधारित सेवांवरील खर्च कमी होऊ शकतो. तसेच नागरिकांमध्ये स्वप्रांताविषयी अभिमान व आपुलकीची भावना निर्माण होण्यास, तसेच वृद्धिंगत होण्यास मदत होते.

संवर्धनाचे असे उपक्रम अनेक पातळ्यांवरून राबविले जातात. शासनाची धोरणे, कायदे यांद्वारे संवर्धनाची काळजी घेतली जाते. तसेच संशोधन संस्था, प्राणिसंग्रहालये, अभयारण्ये अशा अनेक आस्थापनांद्वारेही सरकार निसर्ग संवर्धनाचे काम करीत असते. सरकारतर्फे अनेक योजना आणि प्रकल्पही राबविले जातात.

खासगी तसेच बिगरसरकारी संस्थाही निसर्ग संरक्षण आणि संवर्धनासाठी झटून कार्य करीत असतात.

'फॉरेस्ट मॅन ऑफ इंडिया' – जादव पाएंग, 'आईस मॅन ऑफ इंडिया' – चेवांग नॉर्फेल आणि वडाच्या झाडांची लागवड करणाऱ्या पद्मश्री थिकम्मा यांसारख्या व्यक्तिगत पातळीवर निसर्गसंवर्धनाचे अनोखे कार्य करणाऱ्या व्यक्तींबद्दलही आपल्याला माहिती असते.

आपल्या आजूबाजूलादेखील असे अनेक उपक्रम सुरू असतात, जे ध्येयवादी व्यक्ती आणि संस्थांद्वारे हाती घेतले जातात. बऱ्याच व्यक्ती आपला अमूल्य वेळ अशा उदात्त कार्यासाठी देत असतात. अशा प्रयत्नांतूनच स्थानिक पर्यावरणामध्ये कालपरत्वे लक्षणीय बदल झालेले दिसून येतात, ज्यांचा जागतिक पर्यावरणाशी सहसंबंध आहे.

अशा उपक्रमांची माहिती घेऊन त्यांचे कार्य कसे चालते, हे आपल्याला जाणून घ्यायचे आहे.

### स्थानिक कार्याची काही उल्लेखनीय उदाहरणे

- अफरोज शाह यांची वर्सोवा समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम
- गोरेगाव, मुंबई येथील समीर आठल्ये यांचे, तसेच ओवळेकरवाडी, ठाणे येथील फुलपाखरू उद्यान
- चतु:शृंगी, पुणे येथील स्थानिक वृक्षांचे स्मृतिवन
- दिलीप कुलकर्णी यांचे पर्यावरण सहिष्णू जीवनशैली रुजविण्यासाठीचे उपक्रम
- माहिम निसर्ग उद्यान आणि तेथील नक्षत्र उद्यान व औषधी वनस्पती उद्यान

- कोल्हापूर येथील रंकाळा तलाव सफाई मोहीम.
- 'फर्न', ठाणे या संस्थेचे उपक्रम. जसे निसर्गभ्रमण, पर्यावरणविषयक व्याख्यानमाला इत्यादी
- अहमदनगरच्या कोंभाळणे गावातील राहीबाई पोपरे यांची ८० स्थानिक वाणांच्या बियाण्यांची बँक
- तांदळाच्या स्थानिक वाणांचे सगुणा बाग, नेरळ येथे केलेले जतन
- वेळास येथील सागरी कासवांच्या संरक्षणाची मोहीम
- गोदरेज मॅन्ग्रोव्ह पार्क, विक्रोळी, मुंबई
- 'ब्राऊन लीफ' या संस्थेद्वारे पुण्याच्या अदिती देवधर यांनी सुरू केलेली पालापाचोळा गोळा करण्याची मोहीम
- निळी तूरडाळ, विविध रंगांचा मका, माशांच्या स्थानिक प्रजाती यांचे महाराष्ट्रभर सुरू असलेले संवर्धन (संदर्भ : www.gotul.org.in)
- 'अनुलोम' या NGO ने हाती घेतलेला 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' हा उपक्रम
- 'पाणी फाउंडेशन'चे उपक्रम
- 'जलमित्र' या बंगळुरु येथील संस्थेने केलेले राचेनहळ्ळी सरोवराचे पुनरुज्जीवन
- मालवण येथील प्रवाळ आणि तद्नुषंगिक सजीवांसाठीचे सागरी अभयारण्य

## विद्यार्थ्यांनी काय करावयाचे आहे?

- आपल्या परिसरातील (घर किंवा गाव) निसर्गसंवर्धन करणारा कोणताही एक उपक्रम निवडा.
- उपक्रमाचा सुरुवातीपासूनचा प्रवास जाणून घ्या. जसे की, उपक्रम का व कसा सुरू झाला?
- उपक्रमाचा निसर्गसंवर्धनाचा आराखडा जाणून घ्या.
- हा आराखडा कसा राबविला जातो हे अनुभवा.
- उपक्रमात सहभागी व्यक्तींचा क्षमता विकास कसा घडून येतो ते पाहा.
- उपक्रमाचे कार्यक्षेत्र जाणून घ्या.
- हा उपक्रम राबविताना काही समस्या नक्कीच आल्या असतील. या समस्या व त्यावरील उपाययोजना याविषयी चर्चा करा.
- उपक्रमाच्या दृश्य परिणामांविषयी माहिती मिळवा.
- शक्य असल्यास उपक्रमामध्ये सहभागी होऊन आपले अनुभव नोंदवा.
- शक्य असल्यास नवीन पद्धत/सुधारणा सुचवा.
- तुमच्या परिसरातील पर्यावरणदृष्ट्या महत्त्वाच्या तीन घटना/ जागा/ कृती नोंदवा, ज्यांच्यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचत आहे आणि तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. उदा. गाड्या धुण्यासाठी होणारा पाण्याचा बेसुमार वापर, वृक्षतोड, पाणथळ जागी सुरू असलेले किंवा सुकलेल्या नदीपात्रात/ तलावात होणारे अतिक्रमण इत्यादी.
- प्रकल्प अहवाल लिहा.

**संवर्धनविषयक कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांच्यातर्फे हाती घेतल्या जाऊ शकणाऱ्या संवर्धनात्मक उपक्रमांची काही उदाहरणे**

- फुलपाखरू उद्यान
- सर्पमित्र
- प्राणिमित्र
- गृहनिर्माण प्रकल्प किंवा व्यावसायिक आस्थापनेद्वारे हाती घेतलेले पर्जन्यजलसंधारण, तसेच जलपुनर्चक्रीकरणाचे काम
- भटक्या, जखमी किंवा बेवारस प्राण्यांसाठी आधारगृह
- दुर्मीळ प्रजातींसाठीच्या संरक्षण मोहिमा. उदा. ऑलिव्ह रिडले कासवे, मधमाश्यांना संरक्षण इत्यादी
- स्थानिक वाणांच्या बियाण्यांची बँक
- देवराईचे संरक्षण आणि संवर्धन
- स्थानिक नैसर्गिक वारशाचे जतन आणि संवर्धन
- परिसरातील पाणथळ जागा, नदीपात्रे, तलाव इत्यादी नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण व संवर्धन
- स्थानिक तलावातून गाळ, तसेच जलपर्णीसारख्या वनस्पती काढून टाकणे
- स्थानिक सागर किनाऱ्यांची साफसफाई
- पदभ्रमण, गिर्यारोहण अशा उपक्रमांदरम्यान केली जाणारी साफसफाई इत्यादी

वर काही उदाहरणे दिली आहे. मुख्य विषयाच्या व्याप्तीमध्ये बसणाऱ्या कोणत्याही एका उपक्रमाची माहिती मुलांनी मिळवायची आहे.

(संदर्भ : *www.google.com*)

■